# ४ सामाजिक नेतृत्व

**एकाचे सामर्थ्य..**

CI5IV6

**उद्‌दिष्टे :**

(१) सामाजिक बदल घडवण्याचे महत्त्व आणि हे बदल घडवण्याचे मार्ग त्यांच्या शब्दात सांगता येणे.

(२) सामाजिक बदल घडवण्यासाठी आत्मविश्वासाने पावले उचलण्याचा प्रयत्न करणे.

(३) जीवनशैलीत बदल करून सामाजिक बदलासाठी योग्य दिशेने पहिले पाऊल उचलणे.


(४) सामाजिक समस्या ओळखणे, ती सोडवण्याच्या मार्गांची योजना आखणे आणि प्रत्यक्षात ती समस्या सोडवण्यासाठी क्रियाशील होण्याचा प्रयत्न करणे.

## १. सामाजिक जाळे

**चला, खेळ खेळूया :**

- दहा विद्यार्थ्यांनी एक-एक चिठ्ठी हातात घेऊन गोलात उभे रहावे. एका मुलाच्या हातात दोऱ्याचे रीळ आहे.
- ज्या मुलाच्या हातात दोऱ्याचे रीळ आहे त्याने दोऱ्याचे एक टोक घट्ट धरून खेळाची सुरुवात करावी.
- त्याने/तिने ते दोऱ्याचे रीळ कोणाही दुसऱ्या विद्यार्थ्याला द्यावे आणि त्याच्या हातातल्या चिठ्ठीवर कोणता शब्द आहे ते विचारावे.
- तो शब्द ऐकून पहिल्या मुलाने त्याच्या हातातल्या चिठ्ठीतला शब्द आणि दुसऱ्या मुलाच्या चिठ्ठीतला शब्द यांना जोडणारे वाक्य सांगावे. उदा. पहिला शब्द पक्षी, दुसऱ्या मुलाचा शब्द झाड, तर वाक्य होऊ शकते - 'पक्षी झाडावर घरटी बांधतात' किंवा प्रदूषणामुळे (पहिला शब्द) नदीचे (दुसरा शब्द) पाणी अशुद्ध होते. अशा रीतीने पहिल्या व दुसऱ्या मुलाच्या हातातल्या दोऱ्याने आणि शब्दांनी जाळे विणायला सुरुवात होते.
- आता दुसऱ्या मुलाने/मुलीने हातातील रीळ तिसऱ्या विद्यार्थ्याकडे द्यावे. (त्याने स्वत:चे दोऱ्याचे टोक धरून ठेवावे) दुसऱ्या मुलाने स्वत:च्या व तिसऱ्या मुलाच्या चिठ्ठीतील शब्द यांपासून वाक्य करावे.
- अशाच पद्धतीने तिसऱ्याकडून चौथ्या मुलाकडे दोरा देत आणि जोडशब्द वाक्ये तयार करत दहाव्या मुलापर्यंत खेळ सुरू ठेवावा.

दहा चिठ्ठ्या तयार करा. एकेका चिठ्ठीवर पुढील शब्द लिहा. माणूस, नद्या, हवा, पक्षी, प्रदूषण, प्लॅस्टिक, प्राणी, पाणी, झाडे, माती. (दहा विद्यार्थ्यांमध्ये त्या चिठ्ठ्या वाटा.) दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक चिठ्ठी द्या. मुलांना गोल उभे करा. एक दोऱ्याचे रीळ घ्या. त्यातील एका मुलाकडे दोऱ्याचे रीळ द्या.



- या खेळात मागील पानावरील चित्रात दाखवल्याप्रमाणे मुलांच्या हातातील दोऱ्यांचे जाळे विणले जाईल.
- या जाळ्याच्या दोऱ्यावर कुठेही टिचकी किंवा थापटी मारा आणि काय जाणवते ते अनुभवा.

***विचारात घेण्याचे मुद्दे***

- *विद्यार्थ्यांच्या हातातील दोऱ्याच्या जाळ्यावर कुठेही थापटी/टिचकी मारली तरी सर्व मुलांना दोऱ्याची थरथर जाणवते. यावरून हे लक्षात येईल की परिसरातील/निसर्गातील प्रत्येक गोष्ट एकमेकांशी जोडलेली आहे. एका घटकातील बदलाचा परिणाम दुसऱ्या घटकावर होतो.*
- *याप्रमाणे सर्व मानव परस्परावलंबी असतात. उदा. शहरात राहणारी माणसे धान्योत्पादनासाठी खेड्यातील लोकांवर अवलंबून असतात. शहरातील अनेक कारखान्यांसाठी आवश्यक कच्चा माल ग्रामीण भागातील खाणींमधून येतो म्हणजेच परस्परांच्या समस्या एकमेकांवर परिणाम करू शकतात.*

## २. परस्परावलंबन

**खालील गोष्टींचा तुमच्यावर कोणता परिणाम होईल का? यावर विचार करा.**

(१) वाहनांच्या अतिवापरामुळे जागतिक तापमानात वाढ झाली आहे.



प्रत्येक घटनेसंबंधी चर्चा करायला प्रोत्साहन द्या. हे प्रश्न त्यांचेही आहेत का ते विद्यार्थ्यांना विचारा.



(२) प्लॅस्टिकच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावल्यामुळे ते प्लॅस्टिक जमिनीत साठून राहते. त्यामुळे जमीन निकस व नापीक होते.



(३) खेड्यात तसेच दुर्गम भागात जीवनावश्यक साधनांची कमतरता आणि दुष्काळ यामुळे खेड्यातील रहिवासी शेतीची कामे सोडून नोकरीच्या शोधात शहरात स्थलांतर करतात.



(४) कधीकधी रस्ते बांधणे, धरणे बांधणे, शाळा उभारणे यांसारख्या सार्वजनिक योजनांच्या कामात वेळ जास्त लागतो आणि कामही निकृष्ट दर्जाचे होते.

***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *देशाच्या तसेच जगाच्या एका भागातील समस्येचा परिणाम, समस्यांची एक साखळी सुरू करतो. शेवटी त्या समस्येचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम सर्वांवर होतो.*
- *आपल्या परिसरातील समस्या या दुसऱ्या व्यक्तींच्या समस्या आहेत असे समजून आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. कालांतराने त्या समस्यांचा त्रास आपल्याला होऊ शकतो.*
- *सार्वजनिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. एका माणसाची कल्पना व कृतीही परिस्थितीत बदल घडवू शकते.*

## ३. सामाजिक बदल घडविण्याचे विविध मार्ग

सामाजिक बदलासाठी व्यक्ती अनेक प्रकारे प्रयत्न करू शकतात. उदाहरणादाखल खाली काही प्रकार दिले आहेत. या प्रकारातील तुमच्या परिसरात कार्य करणाऱ्या विविध संस्था, व्यक्ती यांची माहिती घ्यावी.

### अ. समाजसेवा (सामाजिक कार्य)

एखाद्या समूहाला किंवा समाजाला ज्या अत्यावश्यक सेवा मिळत नाहीत त्या मिळवून देण्यासाठी कार्य करणे हा सामाजिक बदल घडवण्याचा एक मार्ग आहे. उदा. कुष्ठरोग झालेल्या रोग्यांना जेव्हा समाज वाळीत टाकत होता त्यावेळी बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांवर उपचार केले आणि त्यांची सेवा केली.





### ब. पायाभूत सुविधा निर्माण करणे.

एखाद्या सामाजिक समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी लहान-लहान कल्पना व योजना सुरू करणे हाही सामाजिक बदलाचा एक मार्ग आहे. उदा. पाण्याची तीव्र टंचाई असणाऱ्या राजस्थानमध्ये डॉ. राजेंद्र सिंह यांनी जनतेच्या सहकार्यातून ४,५०० 'जोहड' (छोटी धरणे) बांधली. त्यांनी सुरू केलेल्या या योजनेमुळे राजस्थानच्या भूजल पातळीत वाढ झाली आहे.

### क. संशोधन

समस्या मुळापासून नष्ट करण्यासाठी संशोधन करून नवे पर्याय शोधून काढणे हा सामाजिक बदलाचा एक प्रभावी मार्ग आहे. उदा. महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते. याचे मुख्य कारण न्युमोनिया होते. डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांनी न्युमोनियावर नियंत्रण व उपचार करण्यासाठी संशोधन केले. त्यांच्या या कार्यामुळे त्या भागातील बालमृत्यूंचे प्रमाण कमी झाले आहे.





### ड. सामाजिक चळवळ

समाजातील लोकांना त्यांच्या गरजांची, न्याय हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव करून देऊन ते न्याय हक्क मिळवून देण्यासाठी जनजागृती करणे, सामाजिक चळवळ उभी करणे हा सामाजिक बदलाचा मार्ग आहे.

## चला शिकूया.

सामाजिक बदल घडवून आणण्याचे जे चार प्रकार आपण शिकलो त्याची आणखी काही उदाहरणे पाहू.

| समाजसेवा | पायाभूत सुविधा | संशोधन | सामाजिक चळवळ |
|---|---|---|---|
| अनाथाश्रमाच्या किंवा वृद्धाश्रमाच्या कामात मदत करणे. | लोकसहभागातून रस्ता दुरुस्ती. | शेतीसाठी उपयुक्त अवजारे साधने तयार करणे. | अनिष्ट रुढींविरुद्ध सामाजिक लढा सुरू करणे. |
| शालाबाह्य मुलांना शाळेत आणणे. | जलसंधारण | नवीन औषधे आणि रोगप्रतिबंधक लस शोधणे. | हवेचे व पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी लोकचळवळ सुरू करणे. |
| डोंगर-दऱ्यातील ग्रामीण भागात औषधे व आरोग्य सेवा पुरवणे. | सार्वजनिक शौचालय बांधणे. | सामाजिक समस्यांच्या कारणांचे संशोधन. | जलसाक्षरता चळवळ उभारणे. |
| ज्या मुलांना पुस्तके/ कपडे उपलब्ध नाहीत त्यांना ती उपलब्ध करून देणे. | कचरा व्यवस्थापन | शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा यासाठी संशोधन. | वाहतुकीच्या नियमांचे पालन. |
| | | | |

शेवटच्या रिकाम्या चौकोनात या चारही मार्गांची तुम्हांला माहीत असलेली उदाहरणे लिहा. तुमच्या वहीत तक्ता तयार करा.

तुमच्या परिसरातील सामाजिक काम करीत असलेल्या काही संस्थांची किंवा व्यक्तींची यादी तयार करा.

## ४. सामर्थ्य एकाचे


एखादी सामान्य व्यक्ती जबरदस्त इच्छाशक्तीने किंवा ध्येयाने प्रेरित होऊन आणि कठोर परिश्रमाने त्यांच्या परिसरात किंवा जगात महत्त्वाचा बदल घडवू शकते. खाली काही उदाहरणे दिली आहेत.

सामाजिक बदल घडवण्यासाठी कठोर परिश्रम केलेल्या एका व्यक्तीचा शोध घेण्यासाठी मुलांना प्रवृत्त करा.
त्या व्यक्तींच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती वहीत लिहायला सांगावे व वर्गात सादरीकरण घ्यावे.



**मलाला युसुफझाई** हिला अवघ्या पंधराव्या वर्षी नोबेल पारितोषिक मिळाले. पाकिस्तानच्या उत्तर-पश्चिम भागातील शाळेत मुलींना शिक्षण घेण्यास तालिबानने बंदी घातली होती. तेव्हा तिने तालिबान संघटनेच्या या निर्बंधाला आव्हान दिले. मुलींना शिक्षणाचा हक्क आणि महिलांचे सबलीकरण यासाठी तिने लढा दिला.

गेहलोर हे बिहार राज्यातील एक लहान खेडे आहे. या खेड्यातील गावकऱ्यांना शेजारील मोठ्या गावात जायला वाटेत मोठ्या दगडी डोंगराचा अडथळा होता. तो टाळून शेजारच्या शहरात जाण्यासाठी ५० कि.मी. चालत जावे लागत असे. लोकांचे हे कष्ट पाहून त्या गावातील **दशरथ मांझी** यांनी एक छिन्नी व हातोडा घेऊन त्या डोंगराचे दगड फोडायला सुरुवात केली. तेव्हा इतर गावकरी त्याची चेष्टा करत. ते दशरथला सांगत की एकट्याने डोंगर फोडणे शक्य नाही. लोकांच्या अशा टीकेने खचून न जाता दशरथने डोंगर फोडण्याचे काम चालूच ठेवले. बावीस वर्षांच्या सतत मेहनतीने त्या डोंगरातून रस्ता खोदण्यात त्याला यश आले.





कचरा व्यवस्थापन आणि सुलभ शौचालय बांधणे या सामाजिक कार्यासाठी **बिंदेश्वर पाठक** यांचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांनी 'सुलभ इंटरनॅशनल' ही संस्था सुरू केली. सार्वजनिक ठिकाणी शौचालये उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांचे विशेषत: महिलांचे खूप हाल होतात. लोकांची अडचण दूर करण्यासाठी बसस्टॉप, उद्याने, मंडई अशा सार्वजनिक जागी 'सुलभ' संस्थेने शौचालये बांधली. भारत सरकारने बिंदेश्वर पाठक यांना 'पद्मभूषण' हा राष्ट्रीय सन्मान दिला.

## ५. स्वबदलाचा प्रकल्प




''दुसऱ्या व्यक्तींमध्ये जो बदल करायचा आहे तो बदल आधी स्वत:मध्ये करा व आचरणात आणा'' - महात्मा गांधी

- जेव्हा समाजात एखादा बदल करायचा असतो तेव्हा तो बदल आधी स्वत:त करावा लागतो.
- स्वत:त बदल करू शकलात तरच तो बदल दुसऱ्यांना करण्यास सांगताना आत्मविश्वास वाटेल.
- व्यक्तीतील बदलाची ही योजना प्रत्येक व्यक्तीने स्वत: पूर्ण केली पाहिजे.
- स्वत:तील बदल कसा साध्य करायचा त्यासाठी मार्गदर्शन करणारे काही टप्पे खालील उदाहरणात दाखवले आहेत.

स्वत:तील बदलाच्या एका प्रकल्पाचे उदाहरण दिले आहे. मुलांना अर्थपूर्ण व महत्त्वाची वाटेल अशी एखादी सामाजिक बदलाची योजना आखण्याचे स्वातंत्र्य द्या. ही योजना राबवण्यासाठी उदाहरणात ज्या पायऱ्या किंवा टप्पे दिले आहेत ते केवळ मार्गदर्शनासाठी आहेत. बदलाची जी योजना मुले स्वत:साठी निवडतील ती त्यांनी एक महिना राबवायची आहे. त्याचा अहवाल वहीत लिहायचा आहे.

**शीर्षक :** घरातील प्लॅस्टिकच्या व कागदाचा वापर कमी करणे.



१ **समस्येचे स्वरूप**
घरातून निरूपयोगी म्हणून बाहेर जाणारा कागद व प्लॅस्टिकचा कचरा कमी करणे.

२ **समस्येचे प्रमाण**
घरात साठवणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण ठरवण्यासाठी कचऱ्याच्या बादलीवर १/४, १/२, ३/४, पूर्ण भरलेली अशा खुणा करणे. पाच दिवस रोज बादलीत किती कचरा जमला त्याची नोंद करणे. या पाच दिवसांच्या कचऱ्यावरून कागद व प्लॅस्टिकचा किती कचरा टाकाऊ असतो हे ठरवणे.

३ **विचारमंथन**
कोणत्या प्रकारचे कागद आणि प्लॅस्टिक कचऱ्यात जाते त्याची यादी करा. उदा. धान्य, भाज्या, खाद्यपदार्थांच्या रिकाम्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, चॉकलेटचा कागद, फाटलेले कागद, कागदी पिशव्या यांसारखा कचरा.

४ **पर्यायी मार्ग शोधणे**
प्लॅस्टिकच्या तसेच कागदाच्या कोणत्या गोष्टी तुम्ही कचरापेटीत टाकणे टाळाल? कसे? का? त्याचा पर्याय काय?

५ प्लॅस्टिक आणि कागदाचा कचरा कमी करण्यासाठी तुम्हाला जे उपाय सुचले असतील ते कमीत-कमी एक आठवडा करून पहा.

६ या सात दिवसांत कचरापेटी किती भरली याची नोंद ठेवा. जर कचऱ्याच्या पातळीत (प्रमाणात) काहीच फरक झाला नसेल तर पुन्हा तिसऱ्या टप्प्यावर जाऊन भिन्न पर्यायांचा विचार करा. मात्र कचऱ्याचे प्रमाण थोडे जरी कमी झालेले दिसले तर समस्या सोडवण्याचे तुमचे प्रयत्न योग्य दिशेने आहेत असे समजून हा बदल चालू ठेवा.

७ **प्रकल्प अहवाल**
समस्या सोडवण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेतील अनुभवांची नोंद वहीत करा.

## स्व-बदल करण्यासाठी काही प्रकल्प



दर महिन्याचा वीज, पाणी,
पेट्रोल इत्यादींचा वापर कमी करणे.



रोज एक तास वाचायला आणि लिहायला शिकवणे.




रोज एक तास बहीण-भावाला अभ्यासात मदत करणे.



रोज एक तास घरकामात मदत करून
इतरांच्या कामाचा भार थोडा कमी करणे.



आपण ज्या विषयात मागे पडतो आहोत
त्या विषयात आपली प्रगती करणे.




घरातील ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी वेगवेगळ्या कचरापेट्या तयार करणे. ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करणे.

## ६. सामाजिक बदल–प्रकल्प

स्वत:त बदल करण्याच्या कल्पना यशस्वीपणे राबवल्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढला असेल. आता बदलाचा दृष्टिकोन जरा व्यापक करूया.

सभोवतालच्या समाजातील काही प्रश्न किंवा समस्या तुम्हांला लक्षात आल्या असतील तर ती परिस्थिती कशी बदलता येईल याचा विचार करा.

सामाजिक बदल घडवण्यासाठीच्या प्रकल्पांच्या पायऱ्या किंवा टप्पे नमुन्यासाठी दिले आहेत ते अभ्यासपूर्वक वाचा.

विद्यार्थ्यांचे गट करून सामाजिक बदलाचे प्रकल्प करण्यास सांगावे. या प्रकल्पासाठी तीन महिन्याचा वेळ द्यावा. प्रकल्पासाठी परिसरातील सामाजिक प्रश्न निवडणे, तो प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध आहे का ते तपासणे आणि समाजाचा प्रत्यक्ष सहभाग मिळविण्याची गरज या विषयी मार्गदर्शन करावे.

### पहिली पायरी : सामाजिक समस्येची निवड.

- सामाजिक बदल करण्यासाठी समस्येची निवड खूप काळजीपूर्वक करावी. दुसऱ्यांच्या वेदनेने तुम्ही कधी फार अस्वस्थ झाला होतात का ते आठवून पहा.
- एखादी घटना किंवा प्रसंग पाहून कधी तुमच्या डोळ्यांत पाणी आले होते का ? ती समस्या सोडवण्यासाठी तुम्ही काही मदत करू शकता असे तुम्हांला वाटते का ?
- या पद्धतीने तुम्हांला समस्या निवडता न आल्यास तुमच्या परिसरातील मित्रांच्या घरी जाऊन त्यांच्या समस्यांविषयी त्यांना प्रश्न विचारा. त्यांच्या अडचणी समजून घ्या. या मुलाखतींमधून तुम्हांला ज्या समस्या समजतील त्यांची यादी करा.

### दुसरी पायरी : बदल करण्यासाठी समस्या निश्चित करणे.

- तुमच्या परिसरातील ज्या समस्यांची यादी तयार केली आहे त्या समस्यांबद्दल पुढील प्रश्न स्वत:ला विचारा.

१. ही समस्या तुमच्या दृष्टीने खूप मोठी आहे का ? जसे : गावातील सर्व व्यक्तींना साक्षर करणे. तसेच ती समस्या फार लहान नसावी. जसे घराच्या मागच्या अंगणात १ झाड लावणे.

२. हा बदल घडवण्यासाठी लागणारा पैसा आणि मानवी मदत तुमच्या गटाला करता येणे शक्य आहे का ?

३. हा बदल घडवण्यासाठी जे कौशल्य, माहिती आवश्यक आहे ती तुमच्या गटाकडे आहे ना ? तुम्ही जो बदल किंवा सुधारणा करणार आहात तिचे मोजमाप करता येईल का ?

### तिसरी पायरी : समस्या स्पष्ट शब्दात मांडणे.

- समस्या आणि त्यासंबंधी तुम्ही निश्चित केलेली कृती स्पष्ट शब्दात मांडणे. उदा. आमच्या परिसरातील निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे ही समस्या आहे. त्यासंबंधी आमच्या गटाने पाच व्यक्तींना साक्षर करायचे ठरवले आहे. त्यामुळे त्यांना साधी वाक्ये वाचता व लिहिता आली पाहिजेत. अशीच प्रत्येक गटाने समस्येची स्पष्ट मांडणी करायची. उदा. ............ ही समस्या आहे. त्यासंबंधी आम्ही ............ करणार आहोत. त्यामुळे ............ झाले पाहिजे.



**चौथी पायरी : समस्या सोडवण्याचे मार्ग**

● तुम्ही निवडलेली समस्या सोडवण्यासाठी त्या समस्येसंबंधी तज्ज्ञ व्यक्तींशी/पालकांशी बोलून त्यांचे मार्गदर्शन घ्या. गटातील सर्व मुलांना समस्या सोडवण्यासाठी सुचलेल्या कल्पना समजून द्या. शिक्षकांशी व पालकांशीही त्या विषयावर बोला. उदा. समस्या सोडवण्यासाठी म्हणजे निरक्षर प्रौढांना साक्षर करण्यासाठी पुढील पर्यायांचा विचार करता येईल.

१. त्या प्रौढांना शिकण्यास प्रोत्साहन देणे.

२. त्या अशिक्षित प्रौढांना त्यांच्या सोयीच्या वेळी गटातील मुलांनी शिकवणे.

तुम्ही कोणाला साक्षर करायचे ठरवले आहे आणि त्यांच्यासाठी कोणता मार्ग योग्य आहे यावर तुमची पर्यायी मार्गाची निवड ठरेल.



**पाचवी पायरी : योजना सादर करणे.**

● निवडलेली समस्या सोडवण्यासाठी कृती आराखडा तयार करणे.


● वर्गातील सर्व मुलांना तुमची योजना समजावून सांगणे. त्यावर वर्गातील इतर मुलांच्या प्रतिक्रिया विचारात घेणे.

**सहावी पायरी : समस्या सोडवण्यासाठी प्रत्यक्ष कृती.**

● हा टप्पा थोडा अवघड असतो.

● तुमच्या योजनेप्रमाणे प्रत्यक्ष कृती करताना काही अडथळे येऊ शकतात. तुम्हांला त्या अडचणी दूर करण्याचे मार्ग ऐनवेळी शोधावे लागतात.

● हे अडथळे दूर करण्यासाठी गरज असल्यास शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.



**सातवी पायरी : बदल किती झाला त्याचे मापन.**

● समस्येच्या संदर्भात काही विधायक बदल घडवण्यात तुम्ही यशस्वी झालात का?

● ज्या स्थितीपासून तुम्ही सामाजिक बदलासाठी प्रयत्न केले त्यात थोडी देखील सुधारणा झाल्यास ते तुमचे यश आहे.

● शक्य असल्यास बदलाचे मापन करा किंवा शब्दात वर्णन करा.

● जर काहीच बदल झाला नसेल तर काय चुकले याची कारणमीमांसा करा.

**आठवी पायरी : बदलाचा लेखी अहवाल तयार करणे.**

● समूहाच्या समस्या सोडवण्यासाठी किंवा परिस्थितीत बदल करण्यासाठी तुमच्या गटाने जे काम केले त्याचे फोटो काढा.

● तुमच्या कामामुळे त्या लोकांना काय व कसा फायदा झाला ते त्यांच्याकडून समजून घ्या.

● फोटो, अन्य पुरावे आणि लेखी प्रतिक्रिया प्रकल्प वहीत चिकटवा.



**नववी पायरी : स्वत:ची पाठ थोपटा.**

● सामाजिक बदल किती दिसून आला यापेक्षा तुम्ही समाजाच्या प्रश्नांबद्दल जाणीवपूर्वक जी कृती केली ते खूप कौतुकास्पद आहे.

● सामाजिक बदलाचे काम तुम्ही पूर्ण क्षमतेने केले असेल तर स्वत:ची व गटाची पाठ थोपटून कौतुक करा.

सामाजिक बदलासाठी काही नमुना प्रकल्प खाली दिले आहेत. मात्र योग्य वाटतील ते प्रकल्प निवडण्याचे स्वातंत्र्य तुम्हांला आहे.

१. शाळेतील स्वच्छतागृहांची अवस्था सुधारणे.

२. शाळेतील परिसर नियमित स्वच्छ ठेवण्यासाठी व्यवस्था करणे.

३. शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून त्यांची काळजी घेणे.

४. तुमच्या गल्लीतील किंवा इमारतीतील कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्यापासून खत निर्माण करणे.

५. शेजारच्या एखाद्या अशिक्षित व्यक्तीला लिहायला वाचायला शिकविणे.

## माझे प्रशस्तिपत्रक

बदलासाठी योजना आखण्यापासून ते काम पूर्ण होईपर्यंत तुम्हांला जे अनुभव आले आणि त्यात कसे यश मिळवले त्याचे प्रशस्तिपत्रक स्वत:साठी तयार करा. तुमच्या प्रयत्नांचे, मेहनतीचे त्यात कौतुक करा.

## मूल्यमापन

| भारांश – २०% | | | | |
|---|---|---|---|---|
| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
| स्वत:तील बदलाचा प्रकल्प सादर करणे. | स्वत:चे सामर्थ्य समजून स्वत:तील बदलाचा प्रकल्प पूर्ण केला. प्रकल्प स्पष्ट शब्दांत मांडला. संबंधित प्रश्नांना समाधान-कारक उत्तरे दिली. | स्वत:तील बदलाचा प्रकल्प पूर्ण केला. | स्वत:तील बदलाच्या प्रकल्पाची माहिती फार मोघमपणे दिली. विचार स्पष्ट नाहीत. | |
| सामाजिक बदलाचा प्रकल्प पूर्ण करणे. | सामाजिक बदलाचा प्रकल्प प्रामाणिकपणे पूर्ण केला. प्रकल्प स्पष्ट शब्दांत मांडला. त्यासंबंधीच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. फोटो किंवा समुदायाच्या लेखी प्रतिक्रिया सादर करून सामाजिक बदलाचा पुरावा दिला. | सामाजिक बदलाचा प्रकल्प प्रामाणिकपणे पूर्ण केला. प्रकल्प स्पष्ट शब्दांत मांडला. त्यासंबंधीच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. परंतु सामाजिक बदलाचा पुरावा म्हणून फोटो आणि समुदायाच्या लेखी प्रतिक्रिया सादर केल्या नाहीत. | सामाजिक बदलाच्या प्रकल्पाबाबत स्पष्टता नाही. सामाजिक बदलासाठी काय कृती आणि का व कशा केल्या ते स्पष्ट नाही. | |


धैर्यधर, तुझ्यात काहीच कमी नाही का रे?
आहे ना! एक गोष्ट आहे जी मी इतक्या वर्षात शिकलो नाही.
चला! काहीतरी सापडले. काय आहे ते?
कला निर्माण करणे किंवा त्याचा रसास्वाद घेणे.
तुझ्या मते तुला हे जमत नाही?
(उदास होऊन) दुर्दैवाने! मी धैर्यशील बनण्यात इतका व्यस्त होतो की आधी मानव व्हायला पाहिजे हेच विसरलो.
आपल्या आजूबाजूच्या कलेशी जोडून घेता येणे ही मानवासाठी खूप मोठी देणगी आहे.... आपण दोघे मिळून शिकायचे का? तुला काय वाटतं?